# पदवी चा काळ हा उमेदीचा काळ असतो - श्री. श्रीकांत खोत




महाविद्यालयातील डॉ. के. एस. चौगुले स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व संजय घोडवत इन्स्टिट्यूट फॉर अडमिनिस्टेटिव्ह सर्विसेस याच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व सराव चाचणी या विषयावर मा.श्री. श्रीकांत खोत सहा. प्राध्यापक संजय घोडवत इन्स्टिट्यूट फॉर अडमिनिस्टेटिव्ह सर्विसेस यांचे व्याख्यान व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर सराव चाचणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष IQAC समन्वयक मा. श्री. अनिल महाजन होते. प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव मा. श्री. शिवाजीराव पाटील उपस्थित होते. स्पर्धा परीक्षा समन्वयक श्री. जगदीश सरदेसाई, विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खोत सर म्हणाले महाविद्यालयाने स्पर्धा परीक्षा केंद्र चालू करून संधी उपलब्ध करून दिली आहे या संधी चे सोने करा.

अभ्यासाचे योग्य नियोजन पदवी मध्ये असताना केले पाहिजे म्हणजे पदवी पूर्ण होताच यशस्वी होऊ शकता. पदवी चा काळ हा उमेदीचा असतो तो वाया घालवू नका त्याचा वापर स्पर्धा परीक्षा साठी करावा असे आवाहन यावेळी केले.

यावेळी आभार श्री. डी. बी. इनामदार तर सूत्रसंचालन श्री. पी. डी. माने यांनी मांडले.